सत्यमेव जयते


महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग

# जिल्हा नियोजन समिती,

# जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

सांगली-मिरज रोड, विजयनगर चौक, सांगली-४१६ ४१५

ई :मेल-dposangli२२@gmail.com

दुरध्वनी क्र.: ०२३३-२६००५२५


## जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली या कार्यालयात कंत्राटी पद्धतीने शासकीय सेवानिवृत्त स्थापत्य अभियंता पद भरतीसाठीची जाहिरात

जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली या कार्यालयात विविध शासकीय यंत्रणांकडून प्राप्त होणा-या अंदाजपत्रकांची तपासणी करण्याकरिता ११ महिन्याच्या कालावधीकरिता निम्नलिखित करार तत्वावरील पदाच्या भरतीसाठी अर्हता प्राप्त उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदनाम | एकूण पदे | अहर्ता व अनुभव | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| १) | स्थापत्य अभियंता | ०१ | १) उमेदवार हा **उप अभियंता किंवा शाखा अभियंता गट ब** या संवर्गामधील सेवानिवृत शासकीय अधिकारी असावा.<br>२) संबधित कामाचा किमान ०५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.<br>३) करार पद्धतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.<br>४) करार पद्धतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिका-याविरूद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. | दरमहा एकत्रित मानधन रू.२५,०००/- |

वरील पदासाठी उमेदवारांनी आपला विहीत नमुन्यातील अर्ज फक्त टपालाद्वारे अथवा व्यक्तीश: दि.**२९** जानेवारी, २०२१ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत पोहचतील अशा बेताने जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली-मिरज रोड, विजयनगर चौक, सांगली-४१६ ४१५ या पत्यावर पाठवावीत. ई-मेल तसेच कुरीयरद्वारे पाठविण्यात आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

सर्वसाधारण सूचना:

१) वरील पदांसाठीची कमाल वयोमर्यादा ६५ वर्षे राहील.

२) कंत्राटी पदाची नेमणूक ही फक्त ११ महिन्याच्या कालावधीकरीता राहील.

३) वरील पद निव्वळ कंत्राटी स्वरूपातील असून पदासाठीचे वेतन हे एकत्रित मानधन आहे. नेमणूक होणा-या उमेदवारास शासकीय अधिकारी/कर्मचा-याप्रमाणे मिळणा-या इतर सोई सुविधांचा लाभ मिळणार नाही.

४) करार पद्धतीने नेमणूक झालेल्या उमेदवारांच्या कामकामाजा आढावा जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, सांगली हे नियमित घेतील. कामकाजाचा आढावा असमाधानकारक असल्यास उमेदवारास कोणतीही पूर्वसूचना न देता नेमणूक समाप्त करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडे राहतील.

५) करार पद्धतीने नेमणूक झालेल्या उमेदवारास जिल्हा नियोजन अधिकारी, सांगली व जिल्हाधिकारी, सांगली यांच्या नियंत्रणाखाली आपले कर्तव्य व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील तसेच या उमेदवारास नियमित पूर्ण वेळ काम करणे बंधनकारक राहील.

६) करार पद्धतीवरील नियुक्त उमेदवारास नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही. करार पद्धतीवरील उमेदवाराने कामावर रूजू होण्यापूर्वी सर्व अटी व शर्ती मान्य असल्याची लेखी हमी रू.१००/- च्या स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र करारपत्र नोटरी करून करून सादर करणे आवश्यक राहील. तसेच पदाच्या नियुक्ती आदेशाचा संदर्भ घेऊन मा. न्यायालयात कायमस्वरूपी कामावर सामावून घेणेबाबत याचिका दाखल करणार नाही, अशा आशयाचे रू.१००/- च्या स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र नोटरी करून कामावर हजर होताना सादर कार्णे आवश्यक राहील.

७) उमेदवारास संगणकीय ज्ञान असणे आवश्यक आहे. MS-CIT किंवा तत्सम संगणक परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र अपेक्षित आहे.

८) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील गठित करण्यात आलेल्या निवड समितीचा निर्णय हा अंतिम राहील, त्यासाठी कोणतेही निवेदन/तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

९) कोणतीही पुर्व सूचना न देता निवड प्रक्रिया व निकष बदलण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार निवड समितीस राहतील.

१०) वरील पदाच्या उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे व मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

११) उमेदवाराने आपला अर्ज, शैक्षणिक आर्हता, अनुभव व इतर यांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडाव्यात. मुळ प्रमाणपत्रे अर्जासोबत जोडू नयेत.

१२) उमेदवारांनी अर्जामध्ये नांव, पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी इ. माहितीसह संपूर्ण अर्ज व्यवस्थित भरावा.

१३) अर्जाच्या छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचीच मुलाखत घेण्यात येईल.

१४) मुलाखतीची सूचना उमेदवारांना त्यांच्या पत्त्यावर टपालाने अथवा ई-मेलवर अथवा दुरध्वनी/भ्रमणध्वनीद्वारे पाठविण्यात येईल.

१५) अर्जदाराने अर्ज ए-४ आकाराच्या कागदावर टंकलिखित करून अथवा https://sangli.nic.in या संकेतस्थळावरून अर्जाचा नमुना डाऊनलोड करून भरून पाठवावयाचा आहे.

१६) उमेदवारांना मुलाखतीस बोलविल्यास त्यांना स्व: खर्चाने हजर रहावे लागेल. त्यासाठी त्यांना कोणत्याही प्रकारचा भत्ता दिला जाणार नाही.

१७) सदर जाहिरातींमध्ये कोणत्याही बदल करण्याचे किंवा रद्द करण्याचे अथवा निवड यादी कोणत्याही वेळी रद्द करण्याचे अधिकारी मा. जिल्हाधिकारी, सांगली यांना आहेत.